**CNR NO- MHSO060020502017**

नियमित दिवाणी दावा क्र.११२/२०१७
आय.ए. क्र. २/२०२२
योगीता भोसले
वि.
रामचंद्र भोसले व इतर.

## नि.६० वरील आदेश
## (घोषित दि. १३/०९/२०२२)

०१] प्रस्तुतचा अर्ज वादीतर्फे दाखल करण्यात आलेला असून असे नमूद करण्यात आले की, वादी व तिच्या पतीचे लग्नाचे वेळी फोटो काढण्यात आले होते ज्यापैकी दोन फोटो वादीने तिच्या माहेरी नेलेले आहेत सदर दोन फोटो वादीकडे असून त्याची निगेटीव्ह प्रतिवादींकडे आहे. सबब प्रतिवादींना सदर फोटोच्या निगेटीव्ह दाखल करण्याबाबत आदेशीत करण्याची विनंती करण्यात आलेली आहे.

०२] प्रतिवादीनी सदर अर्जास विरोध करुन असे नमूद केले की, प्रतिवादींनी वादीचा विवाह झाल्याचे स्पष्टपणे नाकारलेले आहे. जे फोटो दाखल करण्यात आले त्याची निगेटीव्ह प्रतिवादींकडे नाही. वादीने काल्पनीक कथनाच्या आधारे पुरावा गोळा करण्यासाठी खोटा अर्ज केलेला आहे सबब अर्ज नामंजूर करण्याची विनंती करण्यात आलेली आहे.

०३] वादीने सरसनिरस मानाने मयत निलेश उर्फ सतिश भोसले याच्या मिळकतीमध्ये वाटप होवून मिळणेकरीता दावा दाखल केला असून ती निलेश उर्फ सतिश भोसले याची पत्नी असल्याचे कथन केले आहे. प्रतिवादींनी सदरचा विवाह स्पष्टपणे नाकारलेला असून वादी मयत निलेश उर्फ सतिश याची पत्नी नसल्याचा बचाव घेतला आहे. त्या अनुषंगाने मुद्दा क्र. १ नि.क्र. ३७ वर काढण्यात आलेला आहे व तो मुद्दा सिध्द करण्याची जबाबदारी वादीवर आहे.

०४] वादीतर्फे दोन फोटो पटलावर दाखल करण्यात आलेले असून असे नमूद केले की, या फोटोची निगेटीव्ह प्रतिवादींकडे आहे परंतु प्रतिवादींनी सदरची बाब स्पष्टपणे नाकारलेले आहे. प्रतिवादींनी त्यांचेकडे वादी म्हणते त्याप्रमाणे त्या फोटोची

निगेटीव्ह नसल्याचे कथन केलेले असल्यामुळे आता प्रतिवादींना वादीने केलेल्या विनंतीनुसार फोटोच्या निगेटीव्ह दाखल करण्याचे आदेश पारीत करणे संयुक्तीक होणार नाही. विवाह झालेला आहे ही बाब सिध्द करण्याची सर्वस्वी जबाबदारी वादीवर आहे. अश्या परिस्थीतीत वादी भारतीय साक्षी पुरावा अधिनियमांतर्गत असलेल्या परीस्थीतीनुसार आपली बाजू योग्य त्या रितीने सिध्द करु शकते. सबब, प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्याचे माझे मत झालेले आहे करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

अर्ज नामंजूर करण्यात येतो.

AMIT ASHOKRAO KHANDALE
Digitally signed by AMIT ASHOKRAO KHANDALE
Date: 2022.09.13 17:16:13 +0530

**दि.१३/०९/२०२२.**

**(अमित अ.खंडाळे)**
**२रे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,**
**पंढरपुर.**

## CERTIFICATE

I, affirm that the contents of this PDF file Order/Judgment are same word to word, as per the original order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Employee | : | Shirsikar V. G., Stenographer |
| Court | : | 2nd Jt. C.J.S.D. Pandharpur |
| Date | : | 13.09.2022 |
| Judgment/order signed by | : | |
| the Presiding Officer on | : | 13.09.2022 |
| Judgment/Order uploaded | | |
| **on** | **:** | 13.09.2022 |